**-: प्रेसनोट :-**

स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव.
दिनांक :- ११/०७/२०२५.

**जळगांव शहरातील नामांकित हॉटेल रॉयल पॅलेस मध्ये अवैधरित्या चालणाऱ्या जुगार अड्यावर स्थानिक गुन्हे शाखा यांच्या कडुन छापा.**

===ooo===

जळगांव जिल्हयात वाढत असलेल्या जुगाराचे प्रमाण वाढत असले बाबत मा.डॉ.श्री.महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव, मा.श्री.अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, जळगांव परिमंडळ यांच्या सुचने नुसार मा.श्री.संदीप गावीत, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगांव उपविभाग, जळगांव यांच्या लेखी आदेशान्वये मा.श्री.संदीप पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा,जळगांव यांनी त्यांचे अधिनस्त पो.उप.निरी.शरद बागल, सहा.फौ.अतुल वंजारी, पो.हे.कॉ. अकरम याकुब शेख, पो.हे.कॉ.नितीन बाविस्कर, पो.हे.कॉ.प्रविण भालेराव, पो.हे.कॉ.संदिप चव्हाण, पो.ना.किशोर राजाराम पाटील, पो.कॉ.रविंद्र श्रावण कापडणे अशांचे पथक तयार करुन दि.१०/०७/२०२५ रोजी गोपनिय बातमीदाराकडून मिळालेल्या बातमी प्रमाणे, हॉटेल रॉयल पॅलेस, जयनगर, सागरपार्क मैदाना जवळ जळगांव येथील रुम नं. २०९ मध्ये काही इसम स्वता:चे फायदयासाठी तिन पत्ती जुगारावर पैसे लावून हार जित तिन पत्ता (झन्ना मन्ना) जुगाराचा खेळ खेळत आहे. अशी माहिती प्राप्त झालेवरुन दि.११/०७/२०२५ रोजी रात्री ००.०१ ते ०१.०० वाजे दरम्यान हॉटेल रॉयल पॅलेस येथे जावून स्था.गु.शा.पथकाने खात्री केली असता, नमुद हॉटेल मधील रुम नं. २०९ हा मदन लुल्ला याचे नावावर आरक्षीत केला होता. सदर ठिकाणी जावून छापा कारवाई केली असता छापा कारवाई दरम्यान एकूण ०८ इसमांकडून एकुण १९,९७,०००/- रु.किमतीचे रोख रक्कम व वेगवेगळया कपंनीचे १३ मोबाईल हॅन्डसेट जु.वा.कि.अ. असा मुद्देमाल मिळून आला. सदरचा मुद्देमाल व ०८ इसम ताब्यात घेवून त्यांचे विरुध्द सहाफौ.अतुल वंजारी यांच्या फिर्यादीवरुन रामानंदनगर पोलीस ठाण्यास सी.सी.टि.एन.एस.क्र.२५३/२०२५, महा.जुगार कायदा कलम १२(अ), ४,५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास रामानंदनगर पोलीस करत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
जळगांव पोलीस